88

## MAHARASHTRA ACT No. XIV OF 1976

## THE MAHARASHTRA UNEMPLOYMENT ALLOWANCE PAYMENT TO WORKMEN IN FACTORIES (FOR TEMPORARY PERIOD) ACT, 1976.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती, यांची संमती, दिनांक १७ एप्रिल १९७६ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम. ए. ओत्रे,
सह सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## MAHARASHTRA ACT No. XIV OF 1976

AN ACT TO REQUIRE EMPLOYERS TO PAY UNEMPLOYMENT ALLOWANCE TO CERTAIN WORKMEN WHO, DUE TO SHORT WORKING OF FACTORIES ON ACCOUNT OF SHORTAGE OF POWER, CANNOT BE GIVEN EMPLOYMENT THEREIN ON CERTAIN DAYS DURING A CERTAIN TEMPORARY PERIOD AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक १८ एप्रिल १९७६ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

**वीजकपातीमुळे कारखान्यांचे कामाचे तास कमी झाल्याने ज्या विवक्षित कामगारांना, विवक्षित तात्पुरत्या मुदतीत, मालक विवक्षित दिवशी कारखान्यांत कामावर ठेवू शकत नसतील अशा विवक्षित कामगारांना बेकारी भत्ता देण्यास मालकांना भाग पाडण्याची आणि त्याच्याशी संबंधित बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** वीजकपातीमुळे कारखान्यांचे कामाचे तास कमी झाल्यामुळे ज्या विवक्षित कामगारांना एकतर सबंध राज्याच्या संबंधात किंवा त्याच्या एखाद्या भागाच्या संबंधात अधिसूचित केलेल्या तात्पुरत्या मुदतीत मालक विवक्षित दिवशी कारखान्यांत कामावर ठेवू शकत नसतील अशा विवक्षित कामगारांना बेकारी भत्ता देण्यास मालकांना भाग पाडण्याची आणि त्याच्याशी संबंधित बाबींची तरतूद करण्यासाठी राज्यपालांनी त्वरित कारवाई करणे जीमुळे आवश्यक झाले, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती ; आणि म्हणून, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र कारखान्यांमधील कामगारांना (तात्पुरत्या कालावधीसाठी) बेकारी भत्ता देण्याबाबत अध्यादेश, १९७६ हा दिनांक ५ फेब्रुवारी १९७६ रोजी प्रख्यापित केला ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे, राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** आता भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ आणि प्रवर्तन. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र कारखान्यांमधील कामगारांना (तात्पुरत्या कालावधीसाठी) बेकारी भत्ता देण्याबाबत अधिनियम, १९७६, असे म्हणता येईल ;

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे ;

(३) तो १६ डिसेंबर १९७५ रोजी अंमलात आला असल्याचे समजण्यात येईल. परंतु, कलम ९ मध्ये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे तो कलम २, खंड (ई) अन्वये वेळोवेळी अधिसूचित केलेल्या तात्पुरत्या कालावधीतच, अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे संबंध राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात, प्रवर्तनात राहील.

व्याख्या. २. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "बदली कामगार" म्हणजे ज्यास बदलीपत्रक देण्यात आले असेल आणि कारखान्याच्या हजेरीपत्रकात ज्याचे नाव अंतर्भूत असून जो तात्पुरता अनुपस्थित आहे अशा कामगाराच्या जागी ज्या कामगारास कारखान्यात नोकरीस ठेवण्यात आले असेल, असा कामगार ;

(ब) "कारखाना" म्हणजे ज्या जागेच्या प्रसीमांसह त्या जागेमध्ये दहा किंवा त्यापेक्षा अधिक कामगार कामावर असतील किंवा मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी कामावर होते आणि जिच्या कोणत्याही भागात विजेच्या साह्याने निर्मितीची प्रक्रिया पार पाडली जात असेल किंवा सर्वसाधारणपणे पार पाडली जाते अशी कोणतीही जागा, परंतु त्यामध्ये औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ अन्वये ज्याच्या विवादासंबंधात केंद्र सरकार हे समुचित सरकार आहे अशा कारखान्याचा समावेश होत नाही ;

(क) "व्यवस्थापक" म्हणजे जी त्या वेळेपुरती कारखान्याचे व्यवस्थापन करीत असेल अशी व्यक्ती आणि त्यामध्ये व्यवस्थापक म्हणून काम करण्यास मालकाने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो ; असे प्राधिकारपत्र कारखान्याच्या सूचनाफलकावर प्रदर्शित करून कामगारांना अधिसूचित करण्यात आलेले असले पाहिजे ;

(ड) "कायम कामगार" म्हणजे ज्या कामगारास कायम तत्त्वावर नोकरीवर घेण्यात आले असेल किंवा ज्याची नेमणूक व्यवस्थापकाकडून किंवा व्यवस्थापकाने त्या बाबतीत यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या एखाद्या व्यक्तीकडून लेखी पक्की करण्यात आली असेल असा कामगार आणि त्यामध्ये ज्याने त्या कारखान्यात त्याच किंवा दुसऱ्या व्यवसायातील एकूण तीन महिन्यांचा परिवीक्षा कालावधी पूर्ण केला असेल अशा कामगाराचा आणि ज्यास कायम कामगाराच्या पदावर किंवा रिकाम्या झालेल्या पदावर तो अशा पदावर किंवा रिकाम्या झालेल्या पदावर काम करीत असेल त्या मुदतीत त्याला वेतन प्रदानाच्या प्रयोजनासाठी काम करण्यास सांगण्यात आले असेल किंवा नेमण्यात आले असेल अशा शिकाऊ उमेदवाराचाही समावेश होतो ;

(ई) "तात्पुरता कालावधी" म्हणजे राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत संपूर्ण राज्यासाठी किंवा त्याच्या कोणत्याही भागासाठी विनिर्दिष्ट करील असा (दिलेल्या वाढीसह) कालावधी आणि या खंडान्वये काढलेली कोणतीही अधिसूचना ही जो १६ डिसेंबर १९७५ पूर्वीचा नसेल अशा कोणत्याही दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभावासह काढता येईल ;

(फ) "अस्थायी कामगार" म्हणजे जे काम मूलतः तात्पुरत्या स्वरूपाचे आहे अशा कामासाठी मर्यादित कालावधीसाठी एखाद्या कारखान्यात ज्या कामगारास नेमण्यात आले असेल किंवा एखाद्या कायम स्वरूपाच्या कामातील तात्पुरत्या वाढीच्या संबंधात जादा कामगार म्हणून ज्यास तात्पुरत्या नोकरीवर घेण्यात आले असेल असा कामगार ;

(ग) या अधिनियमात वापरण्यात आलेला "कामगार" हा शब्दप्रयोग आणि वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न दिलेले इतर कोणतेही शब्द किंवा शब्दप्रयोग यांना, "कामगार" या शब्दप्रयोगात बदली कामगार, अस्थायी कामगार आणि शंका निरसनासाठी कायम कामगार यांचासुद्धा समावेश होईल, या फेरबदलासह, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ यामध्ये त्यांना अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले आहेत. तेच त्यांचे अर्थ असतील.

३. (१) ज्या कामगाराचे नाव तात्पुरत्या कालावधीच्या पहिल्या दिवशी हजेरीपत्रकावर किंवा यथास्थिति बदली नोंदवहीवर असेल, त्यास वीजकपातीमुळे कारखान्यातील कामांच्या कमी तासांमुळे तात्पुरत्या कालावधीमध्ये कोणत्याही दिवशी कारखान्यात कामावर घेण्यात आले नसेल त्याबाबतीत, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीन या कलमाच्या पोट-कलम (२) मध्ये उपबंधित करण्यात येईल अशा दराने दर दिवशी आणि तात्पुरत्या कालावधीत प्रत्येक कॅलेंडर महिन्यात उपबंधित करण्यात येतील इतक्या दिवसांसाठी त्यास मालकाकडून बेकारी भत्ता देण्यात येईल. बेकारी भत्त्याचे प्रदान.

(२) देय असलेल्या बेकारी भत्त्याचा दर, तात्पुरत्या कालावधीत त्यास कामावर घेण्यात आले असते तर त्यास जे एकूण मूळ वेतन आणि महागाई भत्ता देय झाला असता त्याच्या ५० टक्क्यांइतका असेल.

प्रत्येक कॅलेंडर महिन्यातील ज्या दिवसांसाठी उपरोक्त दराने बेकारी भत्ता देण्यात येईल त्या दिवसांची संख्या, तात्पुरत्या कालावधीच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या एक वर्षाच्या कालावधीत कामगाराने प्रत्यक्ष काम केले असेल अशा प्रत्येक महिन्यातील एकूण दिवसांच्या सरासरी एवढी असेल :

परंतु प्रत्येक कॅलेंडर महिन्यातील अशा दिवसांची संख्या, त्या महिन्यातील त्यास कामावर घेण्यात आले नसेल अशा दिवसांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—जेथे दोन किंवा त्यापेक्षा जास्त तात्पुरत्या कालावधींमधील अंतर हे एक वर्षापेक्षा कमी असेल तेथे, या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी अशा शेवटच्या तात्पुरत्या कालावधीच्या संबंधात एक वर्षाच्या कालावधीची गणना करण्यासाठी अशा शेवटच्या तात्पुरत्या कालावधीच्या लगत पूर्वीचा तात्पुरता कालावधी किंवा तात्पुरते कालावधी वगळण्यात येईल/येतील.

(३) बेकारी भत्त्याची रक्कम मोजताना देय असलेली रक्कम, आवश्यक असेल त्याबाबतीत, जवळच्या रुपयापर्यंत पूर्णांकात धरण्यात येईल ; पन्नास पैसे आणि त्यावरील भाग एक रुपया म्हणून मोजण्यात येईल आणि पन्नास पैशांपेक्षा कमी भाग दुर्लक्षित करण्यात येईल.

(४) कोणत्याही दिवशी कामगाराने संपूर्ण तास काम केले नसेल त्याबाबतीत, ज्या दिवशी त्याने प्रत्यक्ष काम केले असेल त्या दिवसांची संख्या मोजताना, अशा प्रत्येक दिवशी कामगाराने जितके तास काम केले असेल त्या तासांच्या संख्येची, दिवसांची संख्या निश्चित करण्यासाठी बेरीज करण्यात येईल.

४. (अ) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या उपबंधान्वये अपरिहार्य कामबंदी भरपाई मिळण्याचा हक्क कामगाराला असल्यास ; विवक्षित प्रकरणी

(ब) जर त्याच्या नेहमीच्या सेवेची तरतूद ज्या कारखान्यात केली असेल त्याच कारखान्यात दुसरी कोणतीही पर्यायी सेवा करण्याचे किंवा त्याच शहरात किंवा गावात किंवा त्याच्या कारखान्यापासून ८ कि. मी. च्या परिसरात असलेल्या त्याच मालकाच्या दुसऱ्या कोणत्याही कारखान्यात, जर त्याच्या मालकाच्या मते, अशा पर्यायी सेवेस कोणत्याही विशेष कसबाची किंवा पूर्वानुभवाची आवश्यकता नाही आणि जे वेतन कामगाराला सर्वसाधारणतः मिळाले असते तेच त्या पर्यायी सेवेबद्दलसुद्धा देऊ केले असता तो कामगार ते काम करू शकेल अशी सेवा करण्याचे कामगाराने नाकारल्यास ; कामगारांना बेकारी भत्याचा हक्क नसणे.

(क) कारखान्याच्या दुसऱ्या एखाद्या भागात कामगारांकडून कोणत्याही दिवशी कोणताही संप केला असल्यामुळे किंवा उत्पादन मंद गतीने आरंभल्यामुळे अशाप्रकारे काम पुरवणे कोणत्याही दिवशी शक्य झाले नसल्यास;

कोणत्याही कामगारास बेकारी भत्ता दिला जाणार नाही.

५. (१) ह्या अधिनियमाच्या उपबंधान्वये बेकारी भत्त्याच्या स्वरुपात मालकाकडून कामगारास कोणतीही रक्कम देय असेल त्याबाबतीत कामगारास स्वतः किंवा त्याच्या वतीने यासाठी लेखी प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस किंवा कामगार मरण पावला असल्यास त्याच्या अभिहस्तांकितीस किंवा वारसास, वसुलीच्या इतर कोणत्याही पद्धतीस हानी न पोचता, राज्य शासनाकडे किंवा त्याकडून कोणत्याही क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी प्राधिकृत केलेल्या एका किंवा अधिक अधिकाऱ्यांकडे, देय असलेल्या रकमेच्या वसुलीसाठी अर्ज करता येईल आणि पोट-कलम (२) च्या उपबंधाच्या अधीन, राज्य शासनाची किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याची अशी रक्कम देय मालकाकडून देय रकमेची वसुली.

असल्याबद्दल खात्री झाल्यास, राज्य शासन किंवा असा प्राधिकृत अधिकारी जिल्हाधिकाऱ्याच्या नावे त्या रकमेसाठी प्रमाणपत्र देईल आणि जिल्हाधिकारी जमीन महसुलाची थकबाकी वसूल करण्याच्या रीतीने त्या रकमेची वसुली करील :

परंतु असा अर्ज हा मालकाकडून कामगारास रक्कम देय झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत केला जाईल :

परंतु आणखी असे की, उक्त कालावधीत अर्ज न करण्यासाठी अर्जदाराला पुरेसे कारण आहे याबद्दल राज्य शासनाची किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याची खात्री झाल्यास उक्त एक वर्षाच्या कालावधीनंतरही अर्ज स्वीकारता येईल.

(२) कलम ३ च्या उपबंधानुसार, मालकाने कामगाराला बेकारी भत्ता का दिला नाही याबाबतचे आपले अभिवेदन देण्याची त्याला संधी दिल्याशिवाय आणि त्याच्या अभिवेदनाचा किंवा त्याने प्रस्तुत केलेल्या कोणत्याही पुराव्याचा योग्य विचार केल्याशिवाय आणि आवश्यक असल्यास मालकाचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय पोट-कलम (१) अन्वये कोणतेही प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

शास्ती. ६. जर एखादी व्यक्ती ह्या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील तर ती दोषसिद्धीनंतर ६ महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाच्या किंवा दंडाच्या शिक्षेस किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल आणि जेव्हा असे उल्लंघन चालू राहील त्याबाबतीत पहिल्या दोषसिद्धीनंतर ज्या कालावधीत हे उल्लंघन चालू राहील त्या प्रत्येक दिवशी दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र ठरेल आणि अपराध्यास दंड केल्यास, खटला चालू असलेल्या न्यायालयास, अशा उल्लंघनामुळे त्याच्या मते हानी पोचलेल्या कोणत्याही व्यक्तीस दंड म्हणून वसूल केलेली पूर्ण रक्कम किंवा तिचा काही भाग बेकारी भत्ता म्हणून देण्याचा, निदेश देता येईल.

अपराधांची दखल. ७. (१) ह्या अधिनियमान्वये शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाची किंवा अशा कोणत्याही अपराधास दिलेल्या अपप्रेरणांची, राज्य शासनाद्वारे किंवा त्याच्या प्राधिकारान्वये करण्यात आलेल्या तक्रारीनुसार असेल त्याव्यतिरिक्त, कोणतेही न्यायालय दखल घेणार नाही.

(२) महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्गाच्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाच्या दर्जापेक्षा कनिष्ठ दर्जाचे कोणतेही न्यायालय, ह्या अधिनियमान्वये शिक्षापात्र असणाऱ्या कोणत्याही अपराधाचा खटला चालवणार नाही.

कंपन्यांचे अपराध. ८. (१) या अधिनियमाखालील एखादा अपराध कंपनीकडून झाला असेल त्याबाबतीत, अपराध झाला असेल तेव्हा जी व्यक्ती कंपनीचा कारभार चालविण्यासाठी कंपनीची प्रभारी होती आणि कंपनीच्या कारभारासाठी कंपनीस जी जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनीही अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्यावर खटला भरला जाण्यास आणि तदनुसार शिक्षा होण्यास ती पात्र असेल :

परंतु, या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, अशी व्यक्ती असे सिद्ध करील की, तिच्या नकळत असा अपराध झालेला आहे किंवा अपराध घडू नये म्हणून तिने सर्व वाजवी दक्षता घेतली होती तर, या अधिनियमामध्ये उपबंधित करण्यात आलेल्या कोणत्याही शिक्षेस अशी कोणतीही व्यक्ती पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि असा अपराध कोणताही संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्यांनी कानाडोळा केल्यामुळे किंवा त्यांच्या हयगयीमुळे झाला आहे असे सिद्ध करण्यात येईल त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा इतर अधिकारी हा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्याच्यावर खटला भरला जाण्यास आणि तदनुसार शिक्षा होण्यास तो पात्र ठरेल.

स्पष्टीकरण.—या कलमाच्या प्रयोजनांसाठी—

(अ) "कंपनी" म्हणजे एखादा निगमनिकाय आणि त्यामध्ये, एखाद्या भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या इतर संघटनेचा समावेश होतो, आणि

(ब) भागीदारी संस्थेच्या संबंधात "संचालक" म्हणजे भागीदारी संस्थेतील भागीदार.

९. (१) कलम २, खंड (ई) अन्वये अधिसूचित केलेला तात्पुरता कालावधी समाप्त झाला असला तरीही देय बेकारी भत्ता म्हणून कोणतीही रक्कम वसूल करण्याच्या प्रयोजनासाठी, किंवा अशा कालावधीच्या समाप्तीच्या वेळी किंवा त्यापूर्वी झालेल्या कोणत्याही शास्तीच्या प्रयोजनार्थ किंवा उपरोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी निगडित असलेल्या किंवा त्याच्या आनुषंगिक इतर कोणत्याही प्रयोजनासाठी या अधिनियमाचे उपबंध अंमलात असण्याचे चालू राहील. व्यावृत्ती.

(२) या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे ५ फेब्रुवारी १९७६ पूर्वी, किंवा यथास्थिति, कोणत्याही तात्पुरत्या कालावधीच्या पहिल्या दिवसापूर्वी कोणत्याही व्यक्तीने केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल जर अशा दिनांकापूर्वी अशी कृती किंवा तिचे वर्जन अपराध नसेल तर, ती व्यक्ती अपराध सिद्ध केला जाण्यास पात्र ठरविली जाणार नाही.

१०. (१) महाराष्ट्र कारखान्यांमधील कामगारांना (तात्पुरत्या कालावधीसाठी) बेकारी भत्ता देण्याबाबत अध्यादेश, १९७६ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ चे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही अशाप्रकारे निरसित करण्यात आलेल्या अध्यादेशाद्वारे केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कृती (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) ही या अधिनियमाच्या संबद्ध उप-बंधांनुसार काढण्यात, करण्यात किंवा यथास्थिति देण्यात आली असल्याचे समजण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद),

**य. शं. कानिटकर,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.